नवाकाळ शब्दकोडे-१३९४



आडवे शब्द –

१. संपत्ती, वित्त ३. कमी लेखणे, अपमान करणे ६. देवाघेवाण ८. पावित्र्य, शुचिता १०. शिस्त १२. जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ १३. देवालय १५. एकाग्र नजर १६. दुधावरची साय १८. यश २१. प्रहर, दिवसाचा आठवा भाग २२. पार्वतीचे एक रूप २४. बांबूची टोपली २७. रंगावली २९. बाणा ३१. फसवणे ३३. शक्तिशाली, जोरदार ३४. फेटा ३५. वार्तहर ३६. आप्त, स्वजन ३७. त्रास, संसारातील अडचणी ३८. क्रीडा ३९. सोटा, काठी ४०. शिवाजी महाराजांच्या सैन्याची घोषणा xx xx महादेव ४१. पुष्कळ, विपुल ४२. बोलणे ४३. रात्र, निशा, मुलींचे एक नाव ४५. बुंदीच्या लाडवांचा प्रकार ४७. बसण्याची लाकडी फळी ४८. धूम्रपानाचा प्रकार, चुट्टा ४९. पार्वती ५०. आकर्षण, लोभ ५१. ताबडतोब, त्वरित ५३. कमळ, मुलींचे एक नाव ५४. बळीराजा, कृषक, किसान ५६. छोटे तालवाद्य ५७. नवरदेव ५८. शिकार ५९. राणा प्रताप यांचा घोडा ६१. प्रभात ६३. फुटाणे ६४. आश्रम ६५. भ्रमरी, मुलींचे एक नाव ६७. स्तुती, भलावण ७०. कारखान्यात यंत्रावर काम करणारा ७२. देशी सांघिक खेळ, हुतुतू ७३. भिस्त ७४. शाहिराचे वाद्य ७५. गोष्ट, कथा ७७. ताकद ७८. शुष्क, वाळलेला ७९. हेम, सोने ८१. निर्दालन ८४. अतिशय अशक्त, मरतुकडा ८६. खाबू, लाचखोर ८७. लाजिरवाणे ८९. चुगली ९१. लेखणी ९३. पाव, केक वगैरेतील मुख्य घटक ९४. खड्डा ९५. राबता, उठबस ९६. आईचे वडील ९८. काशी १००. फूल किंवा फळ तोडणे १०१. हेळसांड, दुर्लक्ष १०२. वेगळा, निराळा १०३. अडथळा

उभे शब्द –

१. लहान धनुष्य २. धुंदी, कैफ ३. अग्नी, जाळ ४. कुशल, ठाकठीक ५. गिरी, डोंगर ६. घोड्यांची निगा राखणारा ७. स्थानिक रेल्वेगाडी ८. समूह, समुदाय ९. कढत, उष्ण १०. विरोध, प्रतिबंध ११. सारखेपणा, समानता १४. कोणावरही लगेच विश्वास ठेवणारा १७. इच्छा १९. सरशी, विजय २०. धांदल २३. जाणकार, माहिती असलेला २५. जून, खरबरीत २६. पाण्यात बुडी मारणे २८. फूटबॉल व हॉकीमध्ये संघाचे गुण मोजण्याचे एकक २९. पलंग ३०. वीज, बिजली ३२. लाकूड खाणारा कीटक ३३. ब्रह्मदेव ३४. पलायन ३५. टिपण वही ३८. पाळी, क्रम, हेलपाटा ३९. नाना प्रकारचे ४०. हाताने लिहिलेला मजकूर-साहित्य ४१. श्वापदाचे पंजे ४२. पूर्ण नुकसान करणे ४४. एखादी गोष्ट पाण्यापासून सुरक्षित ठेवणारे आवरण ४५. आकर्षक ४६. पावडर, भुगा ४७. ब्रेड, एक चतुर्थांश ५०. घोड्याची निगा राखणारा ५१. वशिला ५२. झावळीतील काडी ५३. पावसाची झड ५५. अस्वल ५६. अस्थिर ५८. समर्थन, पुष्टी ५९. शिष्य, अनुचर ६०. भरतकाम ६२. वडिलांचा भाऊ ६३. उसाचा रस काढण्याचे साधन ६४. थडगे ६६. माशी पडणे, अपशकुन ६८. वेगळे होणे ६९. रस्ता ७१. त्वरित, लगेच ७३. रामदास स्वामींची रचना (xxx श्लोक) ७६. पोरकट, हसून सोडून देण्याजोगे ८०. पापी लोकांचे मरणोत्तर स्थान ८१. खडूस ८२. पैसेवाला ८३. आमंत्रण ८५. पिठूळ पदार्थ ८६. भास, गैरसमज ८८. धाक ८९. दरवाजा ९०. फळातील मगज ९२. मसाल्याच्या पदार्थातील एक ९३. पुराणातला एक पर्वत, लंकेला जाताना मारुतीने इथे विश्रांती घेतली होती. ९६. आई ९७. ज्यूटचे कापड ९९. मैत्रीण •

नवाकाळ कोडे क्रमांक १३९३ चे उत्तर

आडवे शब्द : १. आलाप ५. गरीब ७. बहीण ९. सचोटी ११. जखीण १२. महती १४. दध्योदन १५. आगर १७. खोकला १८. चल १९. वाटोळे २०. अज २१. गाजरपारखी २३. जमीन २५. माफक २६. पानगळ २८. फापटपसारा ३१. तहनाल ३४. चिरी ३५. लवाद ३६. तख्त ३७. क्षमता ३९. नौबत ४०. आरसा ४२. तोफ ४४. टणक ४५. मदत ४६. वैद्य ४७. करडू ४९. तरुण ५१. रजा ५३. माष ५५. तोडा ५६. सत्कार ५७. दाट ५९. अगम्य ६०. चिपाड ६२. गवार ६४. कष्ट ६५. पात्र ६६. पाणीदार ६७. रमारम ६८. कसदार ७०. पाणी ७१. नटवा ७३. कसब ७५. नखरेल ७७. गणना ७९. खडतर ८२. नरपशू ८४. टाकसाळ ८६. ईश ८८. जवस ८९. परभारे ९२. हाक ९४. मुनी ९५. बटीक ९७. वर्तन ९९. वारेमाप १०१. कवटी १०३. पीडा १०४. वलय १०६. ईद १०७. रण १०८. खट्याळ १०९. पुनव ११०. फासा

उभे शब्द : १. आजतागायत २. लाखी ३. पण ४. नामकरण ५. गती ६. बदल ७. बदनामी ८. हीन ९. सगळे १०. चोर १३. हलाखी १५. आटोकाट १६. रंजक १७. खोपा १८. चलन २०. अफरातफर २२. रचना २३. जळवात २४. नफा २५. मासा २६. पारी २७. गलबत २९. पसार ३०. पसा ३२. हक्क ३३. लक्षण ३४. चिता ३८. मकर ३९. नौदल ४०. आद्य ४१. साम्य ४२. तोकडा ४३. दूत ४४. टणत्कार ४६. वैषम्य ४८. डूल ५०. रुसवा ५२. जादा ५३. मागमूस ५४. विचित्र ५५. तोडपाणी ५८. टकमक ६१. पदार्पण ६२. गगनजाई ६३. इमारत ६५. पारख ६८. कबर ६९. दानशूर ७०. पालक ७२. वाख ७४. सनसनाटी ७६. रेटारेटी ७७. गळ ७८. नाष्टा ८०. डच्चू ८१. रजनीकर ८३. पपई ८५. साध्य ८७. शहारे ९०. भाबडा ९१. तूर्त ९३. कमाई ९६. कवन ९७. वय ९८. नकोसा ९९. वाळू १००. पद १०२. वण १०३. पीळ १०५. लव

इंदू मिलमधील डॉ. आंबेडकरांचा पुतळा पुढील वर्षी पूर्ण उभारणार

» पान १ वरून

महापरिनिर्वाण दिनी आंबेडकरी अनुयायांना त्यांच्या ३५० फुटी पुतळ्याला अभिवादन करता येण्याची शक्यता आहे. हा पुतळा जगातील सर्वात उंच पुतळा आहे. या पुतळ्याच्या रचनेप्रमाणे पुतळ्याचे हात १० ते १२ मजली असतील. यावरून पुतळा किती भव्य असेल याचा अंदाज येऊ शकतो, असेही त्यांनी सांगितले.

पुतळ्याचे बूट सुमारे अडीच टन वजनाचे आहेत. दिल्लीजवळील गाझियाबाद येथून टप्प्याटप्प्याने पुतळ्याचे भाग आणले जातील व त्यानंतर स्मारक स्थळी त्यांना जोडण्यात येईल. या पुतळ्याचे वजन सुमारे दीड हजार टन असेल.

पुतळ्यात दोष नाही

पुतळ्यात दोष आहे हा दावा आनंदराज आंबेडकर यांनी दै. 'नवाकाळ'शी बोलताना खोडून काढला. ते म्हणाले की, जे जे स्कूल ऑफ आर्टमधील तज्ज्ञांसह अनेक जाणकारांचा समावेश असलेल्या समितीने प्रतिकृतीला मान्यता दिली आहे. हा माझ्या एकट्याचा निर्णय नाही. जे लोक आक्षेप घेताहेत ते बाबासाहेबांना भेटलेत का? त्यांनी त्यांना जवळून पाहिले का? पुतळा पूर्ण झाल्यानंतर तो बाबासाहेबांसारखा दिसेल. पुतळ्यात दोष असल्याचा दावा या प्रकल्पाचे वास्तुरचनाकार शशि प्रभू यांनीही दै. 'नवाकाळ'शी बोलताना खोडून काढला. एखाद्या उंच व्यक्तीचा चेहरा तुम्ही खालून बघता तेव्हा वेगळा दिसतो आणि त्याच्या उंचीच्या पातळीवर (आय लेव्हलवर) जाऊन बघतो तेव्हा तो वेगळा दिसतो. लोकांना पुतळा व्यवस्थित पाहता यावा म्हणून आम्ही एक उंच जागी पाईंट ऑफ व्ह्यू उभारणार आहोत, असे प्रभू म्हणाले.

सेंट्रल बँकेचे अस्तित्व कायम ठेवा

पारशी समुदायाची मोदींकडे मागणी

» पान १ वरून

१९६९ साली सर्व खासगी बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आल्यानंतर ही बँक सरकारच्या ताब्यात आली. आता मोदी सरकारने सर्व लहान बँकांचे विलिनीकरण करून एकच मोठी बँक स्थापन करण्याचे धोरण आखले आहे. त्यानुसार या बँकेचे विलिनीकरण होणार आहे. या संदर्भात नुकतीच सुरत पारसी पंचायत फंड या समुदायाच्या सर्वोच्च संघटनेने या बँकेच्या विलिनीकरणावर आपले मत व्यक्त केले आहे. या संघटनेचे अध्यक्ष डॉ. होमी दुधवाला यांनी म्हटले की, या बँकेचे विलिनीकरण जरी करण्यात आले तरी त्याची भारताची पहिली स्वदेशी बँक ही ओळख कायम ठेवावी. मुंबईच्या पारशी संघटनेचे अध्यक्ष झेरक्सेस दस्तुर यांनी म्हटले की, बँक अनेक वर्षांपासून स्वतःच्या पायावर उभी आहे. आम्ही ही बँक वाचवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ही बँक टाटांशीही संबंधित आहे. या बँकेचे पारशी समुदायात फार महत्त्व असून, पारशांच्या अनेक पिढ्यांनी इथे काम केले आहे. जवळजवळ सर्वांचीच खाती या बँकेत आहेत. या बँकेने समाजाच्या प्रगतीत मोठा वाटा उचललेला आहे. त्यामुळे या बँकेची ओळख कायम ठेवण्यात यावी.

शिवसेनेचे धनुष्यबाण चिन्ह कोणाचे?

सुप्रीम कोर्टात आज अंतिम सुनावणी

» पान १ वरून

महत्त्वाचा ठरणार आहे. यासंदर्भात वकील असीम सरोदे यांनी एक्सवर लिहिले की, शिवसेना धनुष्यबाण चिन्हाबाबत उद्या अंतिम सुनावणी घेणार, असे सर्वोच्च न्यायालयाने जाहीर केले आहे. त्यानुसार न्या. सूर्य कांत सुनावणी घेतील अशी अपेक्षा आहे. इकडे मोदी बांधून तयार नसलेल्या विमानतळाचे नवी मुंबईत दिखाऊ उद्घाटन करणार आणि त्याचवेळी संविधानासोबत अनैतिकता करून सत्तेच्या हवेत असलेल्या एकनाथ शिंदे यांचे विमान सर्वोच्च न्यायालय जमिनीवर पाडणार का, हे लवकरच कळेल.

सॅफायर स्पेस इन्फ्राकॉन प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)
आणि
कॉंगलोम टेक्नोकन्स्ट्रक्शन्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)
परिसमापकासह पत्रव्यवहाराचा पत्ता - संपर्क: १०६, १ ला मजला, कनाकिया ॲट्रियम २, क्रॉस रोड ए, कोर्टयार्ड मॅरियटच्या मागे, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३. +९१ ९८१९७१९४५५; ईमेल: rp.sapphireinfracon@gmail.com आणि conglome.liquidator@gmail.com किंवा harishkant2007@gmail.com

ई-लिलाव - आयबीसी, २०१६ अन्वये संपत्तीची विक्री
लिलावाचा दिनांक आणि वेळ: दि. ०७ नोव्हेंबर, २०२५ (शुक्रवार) दु. १.०० ते २.०० वा.
(प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)

आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६च्या विनियमन ३२ व ३३ सह वाचावयाच्या आयबीसी, २०१६ च्या कलम ३५(एफ) अन्वये त्यांच्या संबंधित परिसमापन संपत्तीचा भाग बनलेल्या सॅफायर स्पेस इन्फ्राकॉन प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) आणि कॉंगलोम टेक्नोकन्स्ट्रक्शन्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) दी दोन्ही विक्री. कॉर्पोरेट ऋणकोंकरिता एकत्रित ई-लिलाव **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे", "तेथे जे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर"** आयोजित करण्यात येईल.
निम्नस्वाक्षरीकारांद्वारे विक्री ई-लिलाव सेवा पुरवठादार यांच्या मार्फत ईबिक्रय लिलाव प्लॅटफॉर्म वेबसाईट https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home द्वारे करण्यात येईल.

रक्कम भारतीय रुपयांमध्ये

अ. क्र.	तपशील	राखीव किंमत	ईएमडी	विस्तारयोग्य बोली रक्कम
	पर्याय अ: आयबीबीआय परिसमापन प्रक्रिया विनियमन, २०१६ च्या विनियमन ३२(ई) नुसार संयुक्तरित्या कॉर्पोरेट ऋणकोंची गोईंग कन्सर्न म्हणून विक्री लिलावाचा दिनांक आणि वेळ: दि. ०७ नोव्हेंबर, २०२५ (शुक्रवार) दु. १.०० ते ०२.०० वा.			
१	**अ. कॉंगलोम टेक्नोकन्स्ट्रक्शन्स प्रायव्हेट लिमिटेड:** (सर्व्हे क्र. १७, ३९/२, ३५/१/ए आणि ३९/२/१ राणीशिगाव (नेवाळे) गाव, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र मध्ये असलेल्या मोजमाप अदमासे १६.२२ एकर स्थावर मालमत्तेच्या सर्व खंड आणि तुकड्यांचे संपूर्ण मालक) **ब. सॅफायर स्पेस इन्फ्राकॉन प्रायव्हेट लिमिटेड** (सर्व्हे क्र. १७/२बी, ३९/२, ३५ आणि ११/१ए, राणीशिगाव (नेवाळे) गाव, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र मध्ये असलेल्या मोजमाप अदमासे १६ एकर स्थावर मालमत्तेच्या सर्व खंड आणि तुकड्यांचे संपूर्ण मालक)	भारतीय रुपये ४१,९१,१५,०००	भारतीय रुपये ४,१९,११,५००	भारतीय रुपये २५,००,०००
	पर्याय ब: पार्सलमध्ये संपत्तीची विक्री लिलावाचा दिनांक आणि वेळ: दि. ०७ नोव्हेंबर, २०२५ (शुक्रवार) दु. ०२.०० ते दु. ०३.०० वा.			
१	स्थावर मालमत्ता प्रकल्प (म्हणजेच सत्यनगर प्रकल्प) खालील कॉर्पोरेट ऋणकोच्या संयुक्त मालकीचा आहे: **अ. कॉंगलोम टेक्नोकन्स्ट्रक्शन्स प्रायव्हेट लिमिटेड:** (सर्व्हे क्र. १७, ३९/२, ३५/१/ए आणि ३९/२/१ राणीशिगाव (नेवाळे) गाव, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र मध्ये असलेल्या मोजमाप अदमासे १६.२२ एकर स्थावर मालमत्तेच्या सर्व खंड आणि तुकड्यांचे संपूर्ण मालक) **ब. सॅफायर स्पेस इन्फ्राकॉन प्रायव्हेट लिमिटेड** (सर्व्हे क्र. १७/२बी, ३९/२, ३५ आणि ११/१ए, राणीशिगाव (नेवाळे) गाव, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र मध्ये असलेल्या मोजमाप अदमासे १६ एकर स्थावर मालमत्तेच्या सर्व खंड आणि तुकड्यांचे संपूर्ण मालक)	भारतीय रुपये ४१,९१,१५,०००	भारतीय रुपये ४,१९,११,५००	भारतीय रुपये २५,००,०००

लिलाव प्रक्रियेच्या टीपा:
१. ईएमडी सादर केल्यानंतर बोलीस परवानगी देण्यात येईल. संभाव्य बोलीदारांनी बँकनेट लिलाव प्लॅटफॉर्म द्वारे इसारा रक्कम अनामत (ईएमडी) जमा करावी.
२. परिसमापकांनी कोणतेही कारण न दर्शविता आणि कोणत्याही दायित्वाशिवाय प्रक्रिया रद्द करण्याचे किंवा सुधारित करण्याचे हक्क राखून ठेवले आहेत. ही ना-बंधनकारक प्रक्रिया आहे आणि परिसमापक/हिस्सेदार सल्लागार समितीच्या निर्णय स्वातंत्र्याच्या अधीन असेल. अधिक तपशिलाकरिता प्रक्रिया ज्ञापन पहावे.
३. संभाव्य बोलीदारांनी त्यांच्या नादारी आणि दिवाळखोरी संकेताच्या कलम २९ए अन्वये पात्रतेची उद्घोषणा समाविष्ट असलेले आवश्यक दस्तऐवज सादर करावे. जर बोलीदार अपात्र आढळल्यास, इसारा रक्कम अनामत जप्त करण्यात येईल.

स्वारस्य अभिव्यक्ती सादर करणे/जागेची पाहणी /
ईएमडी सादर करणे याकरिता अंतिम दिनांक : दि. ०५ नोव्हेंबर, २०२५ (बुधवार)
ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ : दि. ०७ नोव्हेंबर, २०२५ (शुक्रवार) दु. १.०० ते ३.००

टीप : ऑनलाईन लिलाव विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्ती, ई-लिलाव बोली कागदपत्र, उद्घोषणा आणि इतर तपशील https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home वर उपलब्ध आहेत.
संभाव्य बोलीदारांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी बोली संबंधी सर्व दस्तऐवज व त्यासह ईएमडी (https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home) द्वारे बँकनेट पोर्टल वर सादर करावे.
कोणत्याही स्पष्टीकरणाकरिता, कृपया निम्नस्वाक्षरीकार यांना conglome.liquidator@gmail.com आणि rp.sapphireinfracon@gmail.com येथे संपर्क करावा.

सही/-
दिनांक: ०८ ऑक्टोबर, २०२५ हरिश कांत कौशिक
ठिकाण: मुंबई सॅफायर स्पेस इन्फ्राकॉन प्रायव्हेट लिमिटेड आणि
कॉंगलोम टेक्नोकन्स्ट्रक्शन्स प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापक
पत्रव्यवहाराचा पत्ता: १०६, १ ला मजला, कनाकिया ॲट्रियम २, क्रॉस रोड ए, कोर्टयार्ड मॅरियटच्या मागे, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३
ईमेल: harishkant2007@gmail.com, rp.sapphireinfracon@gmail.com, conglome.liquidator@gmail.com,
नोंद. क्रमांक: IBBI/IPA-001/IP-P01469/2018-2019/12340
नियुक्तीकरिता प्राधिकृतता दि. ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत वैध

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही (i) १४१, पांडुरंग नाईक मार्ग, शिवाजी पार्क, माहीम, मुंबई - ४०००१६ येथे स्थित "शिव सागर" इमारतीच्या ४ थ्या मजल्यावरील **सदनिका क्र. १२-डी** मोजमाप ३३७.८२ चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ (**"सदर सदनिका"**) व त्यासह सदनिकेच्या संदर्भात निळकंठ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेडद्वारे पारित डिस्टिंक्टिव्ह क्र. २८१ ते २८५ धारण केलेल्या **भाग प्रमाणपत्र क्र. ५७** (**"सदर सम्भाग"**) अंतर्गत पारित ५ पूर्णतः भरणा केलेले सम्भाग (एकत्रितरित्या **"मालमत्ता"**) चे मूळ मालक दिवंगत रमेश एन. चवाथे (**"मालक"**) यांचा मुलगा **श्री. राजीव रमेश चवाथे** यांच्या शीर्षकाची तपासणी करीत आहोत.
श्री. रमेश एन. चवाथे यांचे कोणतेही नामनिर्देशन न करता दि. १७ फेब्रुवारी, २००६ रोजी निधन झाले आणि रेखा रमेश चवाथे यांचे कोणतेही नामनिर्देशन न करता दि. ३० ऑगस्ट, २०२० रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात (i) **राजीव रमेश चवाथे** (मुलगा) आणि (ii) **दीपा दीपक सावंत** (विवाहीत मुलगी) हे केवळ कायदेशीर वारस आहेत. त्यानंतर दीपा दीपक सावंत यांनी नोंदणीकृत हक्कसोड करारनामा दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ (नोंदणीकरण क्र. मुंबई-४/१९९६०/२०२५) अन्वये तिचे सदर मालमत्तेमधील सर्व अविभक्त हिस्सा, हक्क, शीर्षक आणि हितसंबंध तिचा भाऊ राजीव आर. चवाथे याच्याकरिता सोडले आहेत.
कोणा व्यक्तीचा मालमत्ता, किंवा दिवंगत श्री. राजीव रमेश चवाथे यांच्या कायदेशीर वारसाच्या संदर्भात कोणत्याही स्वरुपाचा कोणताही दावा असल्यास, त्याबाबत सर्व सहाय्यक दस्तऐवजांच्या प्रतिसह **प्रज्ञा पी. शिंदे (ॲडव्होकेट)** यांना कार्यालय - द्वारा रॉयचौधरी ॲण्ड असोसिएट्स, दुकान क्र. ११ आणि १२, तळमजला, पंकज बिल्डींग, वाकोला ब्रिज, नेहरू रोड, सांताक्रुझ पूर्व, मुंबई - ४०००५५ येथे किंवा ईमेलः pradnyas571@gmail.com येथे सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या कळवावे
दि. ८ ऑक्टोबर, २०२५
सही/-
प्रज्ञा पी. शिंदे
ॲडव्होकेट
रामेश्वर मीडिया

सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, आमचे अशील याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली **शशिकला बिहारीसरन खंडेलवाल** यांच्या मालकीच्या जागेच्या शीर्षकाची **हॅशटॅग इंडिया प्रायव्हेट लिमिटेड**ला मंजूर आणि कर्जाऊ दिलेल्या रकमेकरिता तपासणी करीत आहेत. सदर शशिकला बिहारीसरन खंडेलवाल यांनी असे सांगितले आहे की, मूळ दस्तऐवज म्हणजेचः सुजाता निकेतन को-ऑप. हौसिंग सोसायटी आणि कल्का सिंग शहदेव सिंग यांच्या दरम्यानचे मूळ करारपत्र दिनांक १७.०४.१९७४ आणि कल्का सिंग शहदेव सिंग आणि सुरेशचंद्रा एस. अग्रवाल व ब्रिजकिशोर एस. अग्रवाल यांच्या दरम्यानचे मूळ करारपत्र दिनांक २८.०३.१९७८ त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत.
स्वतंत्र व्यक्ती, हिंदू अविभक्त कुटुंब (एचयूएफ), कंपनी (कंपन्या), बँक(का), वित्तीय संस्था, बॉन-बँकिंग वित्तीय संस्था, फर्म(स), व्यक्तींची संघटना किंवा स्वतंत्र व्यक्तींचे स्थापित असलेले किंवा नसलेले मंडळ, साकार आणि/किंवा धनको समाविष्ट असलेले परंतु त्यास मर्यादीत नसलेल्या कोणा व्यक्ती(क्ती)चा/संस्था(थां)चा मालमत्ता आणि/किंवा त्याच्या कोणत्याही भाग/तुकड्याच्या संदर्भात वारसा, विक्री, हस्तांतरण, हिस्सा, गहाणवट, तारण, प्रभार, वाटप, भाडेपट्टी, पोट-भाडेपट्टी, धारणाधिकार, परवाना, अभिहस्तांकन, भाडेकरू, भेट, हक्कसोड, देवाणघेवाण, बोजा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड/विभागणी, मृत्युपत्र, उत्तराधिकार, देखभाल, वहिवाट, न्यास, ताबा, कुटुंब, कायद्याच्या कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, कंत्राट/करारपत्रे, भागिदारी, मार्गाचा अधिकार, प्रलंबित कायदेशीर कारवाई, आरक्षण, संपादन, कंत्राट/करारपत्रे, सामंजस्य करार, विक्रीचा करार, मुखत्यार पत्र, पर्याय, वाटप, प्रथम नकाराचा अधिकार, पूर्व हस्तांतरण किंवा कोणतेही दायित्व किंवा कोणतीही वचनबद्धता या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही लाभ, शीर्षक, दावे, आक्षेप, मागण्या किंवा हक्क किंवा कशाही प्रकारे हितसंबंध असल्यास, त्यांनी त्याबाबत सहाय्यक दस्तऐवजांसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून चौदा (१४) दिवसांच्या आत निम्न उल्लेखित पत्त्यावर लेखी कळवावे, असे न केल्यास अशा व्यक्ती/एन्टिटी(टीं)चे हक्क, शीर्षक, दावे, आक्षेप, लाभ, अधिकार, मागण्या आणि/किंवा हितसंबंध जाणूनबुजून आणि स्वेच्छेचे सोडून दिले किंवा त्याग करण्यात आले.

वर उल्लेखित्याचुसार मालमत्तेची अनुसूची

राणी सती मार्ग, मालाड पूर्व, मुंबई-४०० ०९७ येथे स्थित गाव मालाड (पूर्व), तालुका बोरीवलीचा सीटीएस क्र. ४२६ धारण केलेल्या जमिनीवर बांधलेल्या सुजाता निकेतन को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. या इमारतीमधील तळमजल्यावरील दुकान क्र. ३, मोजमाप ५२५ चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ.
दिनांक ८ ऑक्टोबर, २०२५
सही/-
(मे. विलावाला ॲण्ड कं.)
ॲडव्होकेट्स ॲण्ड सॉलिसिटर्स
गहाणवटदारांकरिता
करीम चेंबर्स, २ रा मजला,
४२, अंबालाल दोशी मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ०२३.
रामेश्वर मीडिया

३ हेक्टरपर्यंत मदत! ३१६२८ कोटींचे सरकारचे पॅकेज

» पान १ वरून

३२ हजार ५०० (एकरी १० हजार ८००) आणि बागायती शेतकऱ्यांना हेक्टरी ३२ हजार ५०० (एकरी १३ हजार) अशी मदत मिळणार आहे. रब्बी पिकांसाठी १० हजार कोटींची मदत जाहीर करण्यात आली आहे त्यासाठी शेतकऱ्यांनी प्रत्यक्षात रब्बीचे पीक घेवो अथवा न घेवो, त्यांना ही मदत केली जाणार आहे.

राज्यात ६० हजार एकर जमीन खरवडून गेली आहे. या जमिनीची पुन्हा निर्मिती करणे हे जिकिरीचे काम आहे. त्यामुळे खरडून गेलेल्या जमिनीसाठी ४७ हजार प्रति हेक्टर रोख मदत राज्य सरकारतर्फे केली जाणार आहे. शेतकऱ्यांना जमिनीची निर्मिती करण्यासाठी माती आणावी लागेल. धरणांच्या गाळातून ही माती त्यांना पुरवली जाईल. यासाठी प्रति हेक्टरी ३ लाखांपर्यंतची कामे रोजगार हमी योजना(मनरेगा)च्या माध्यमातून करण्यात येतील.

विहिरी, घरांसाठी मदत

अतिवृष्टीमुळे विहिरींचे नुकसान झाले आहे. एनडीआरएफच्या नियमांनुसार या नुकसानीसाठी मदत केली जात नाही. मात्र राज्य सरकारने ज्यांच्या विहीरींचे विविध कारणांमुळे नुकसान झाले त्यांना प्रति विहीर ३० हजार रुपये मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. पावसामुळे पडझड झालेल्या घरांची पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून पुन्हा उभारणी केली जाणार आहे. याशिवाय गुरेढोरांचे जे नुकसान झाले अशा शेतकऱ्यांना प्रति जनावर ३७ हजार, ओढकाम करणाऱ्या जनावरांसाठी प्रती जनावर ३२ हजार रुपये पती जनावर दिले जातील. कुक्कूट पालन करणाऱ्यांना प्रति कुक्कूट १०० रुपये मदत दिली जाणार आहे. एनडीआरएफची तीन जनावरांची अट काढून टाकण्यात आली असून जितक्या जनावरांचे नुकसान झाले आहे तितकी मदत दिली जाणार आहे.

पीक विम्याचे १० हजार कोटी

राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांनी पीक विमा घेतला आहे. या शेतकऱ्यांना हेक्टरी १५ हजार ते १७ हजार इतकी मदत मिळणार आहे. ही एकूण मदत १० हजार कोटींच्या घरात जाईल. या विमा कंपन्यांनी लवकरात लवकर विम्याची रक्कम द्यावी,असे निर्देश राज्य सरकारने विमा कंपन्यांना दिले आहेत. ज्यांना नियमानुसार मदत करता येणार नाही त्यांना मुख्यमंत्री सहायत्ता निधीतून मदत केली जाईल.

कर्नाटकपेक्षा मोठी मदत- शिंदे

कर्नाटक राज्यापेक्षा आम्ही शेतकऱ्यांना मदत केली आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी बोलताना सांगितले. या पुरामुळे जवळपास ६० लाख शेतकरी बाधित झाले असल्याची माहितीही त्यांनी दिली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, दुष्काळ टंचाईवेळी जे सर्व उपाय केले जाता ते सर्व केले जाईल. जमीन महसुलात सूट दिली जाईल, विजबील वसूल केले जात नाहीत, कर्जवसुली स्थगित होऊन कर्जाचे पुर्नगठन केले जाईल. इतरही जी मदत केली जाते ती करण्यात येईल.

खर्चावर ताण येणार

राज्याचा अर्थसंकल्प तयार करताना इतक्या मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी होईल,असा अंदाज नव्हता. मात्र अनपेक्षित अतिवृष्टीने जी मदत आम्ही देत आहोत त्याचा ताण राज्य सरकारच्या अन्य बाबींबर खर्चावर पडेल, असे सांगतानाच यामुळे काही घटतांवरील खर्चाला कात्री लागू शकते, असे संकेत फडणविस यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात दिले.

वडेट्टीवार, सपकाळ, नवलेंची टीका

काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकारच्या पॅकेजवर टीका केली. ते म्हणाले की, राज्यात मुसळधार पावसाने उद्धवस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अजूनही आसवांचा पूर आहे. शेती पाण्याखाली, जनावरे वाहून गेलेली आणि आयुष्य पुन्हा शून्यावर आले असताना सरकारने जाहीर केलेला पॅकेज म्हणजे शेतक-यांची थट्टा आहे, अशी टीका केली आहे. ? पंजाबसारखे राज्य प्रति हेक्टरी ५० हजार देऊ शकते, मग महाराष्ट्र का देऊ शकत नाही? सरकारने मोठ्या गाजावाजा करीत दिलेले पॅकेज म्हणजे केवळ आकड्यांचा खेळ आहे, मदतीपेक्षा आश्वासने जास्त आणि वास्तवात शेतकऱ्यांच्या हातात काहीच नाही. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, मराठवाड्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारकडून ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचं पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. मात्र, सरकारने जाहीर केलेली मदत ही शेतकऱ्यांच्या तोंडाला पान पुसण्याचे आणि वाटाण्याच्या अक्षता लावण्याचे काम आहे. या सरकारने शेतकऱ्यांना फसवले आहे. शेतकऱ्यांचे दोन प्रकारचे नुकसान झाले आहे. एक म्हणजे खरीपातील पिके आणि फळबागांचे नुकसान आणि दुसरे म्हणजे जमिनी खरडून गेलेल्या आहेत. या दोन्ही नुकसानीसाठी सरकारने सरसकट स्वरूपात मदत जाहीर केलेली नाही. हेक्टरी ५० हजार रुपयांची मागणी असताना दिलेली मदत अत्यंत अल्प आहे. शेतकरी प्रश्नांचे अभ्यासक व अ.भा. किसान सभेचे राष्ट्रीय नेते अजित नवले म्हणाले की, शेतक-यांना ३१ हजार ६२८ कोटींचे आर्थिक मदतीचे पॅकेज दिल्याचे राज्य सरकार सांगत असले तरी राज्य सरकारने आकड्यांचा खेळ करून हातचलाखी केली आहे. मुळात राज्य सरकारने केवळ साडे सहा हजार कोटींचीच आर्थिक मदत जाहीर केली असून उर्वरित १५ हजार कोटींहून अधिकची रक्कम ही जुन्याच तरतुदीतील व योजनांमधील रक्कम आहे.

हैदराबाद गॅझेटवर स्थगिती नाही

» पान १ वरून - असंवैधानिक आहे. यापूर्वी अनेक आयोगांनी मराठा आरक्षणाची गरज नाकारली होती. नारायण राणे समितीने मराठा समाजाला आरक्षण देण्याची शिफारस केली होती. त्यानुसार मराठा समाजाला सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास म्हणून आरक्षण देण्यात आले. पण सर्वोच्च न्यायालयाने ते नाकारले होते. आता सर्व मार्ग बंद झाल्यावर ओबीसीतून आर